

श्री

महाप्रतापी झुंझारवीर.

बक्षीबाहादर जिवबादादा

ऊर्फ

जिवाजि बल्लाळ केरकर यांवरील

पवाडा.

संग्राहक

महाशय नरहर त्र्यंकाजी ऊर्फ

नाना हवालदार.

प्रकाशक

बेळगांव सारस्वतभूषण छा०चे मालक.

सन १८९९

सारस्वतभूषण छा० छा०

किंमत ३ आणे.



प्रकाशकाची विज्ञप्ति.

महाप्रतापी झुंझारवीर बक्षीबाहादर जिवबादादा केरकर, ज्याच्या सत्कीर्तिसुगंधाचा परिमल, गेल्या शतकांत भारतवर्षांत चोहों दिशा व्यापून राहिला होता, ज्याच्या अतुलप्रतापाला ऐकून सुज्ञ इतिहासकार भगवत्प्रिय, वीरशिरोमणी धनुर्धारीची ज्याला उपमा देतात, ज्याच्या सद्धर्मशीलतेचें श्रवण करून ज्याला प्रति धर्माचा अवतार समजतात, अखंड यशोदुंदुभीच्या मनोहर नादानें जो प्रत्यक्ष विजय ह्मटला जातो, आणि ज्याच्या स्वार्थत्यागाचा विचार केला असतां, विदेही जनकनृपाचीच ज्याला उपमा साजते, अशा परम पवित्र विभूतींचें चरित्र ऐकण्याची लालसा कोणा सुज्ञ पुरुषास होणार नाहीं? तथापि अशा परमथोर महाशयाचें चरित्र अझूनी प्रसिद्ध न व्हावें, हें मराठी भाषेचें व महाराष्ट्र लोकांचें केवळ दुर्दैव होय, आणि ग्रंथकर्ते व ग्रंथ प्रकाशक मंडळ्यांचा हा अक्षम्य हलगर्जीपणा होय, असेंच समजलें पाहिजे. महाराष्ट्र भाषेंत इतिहास नांवाखालीं झांकल्या जाणाऱ्या अनेक कादंबऱ्या व नाटकें प्रसिद्ध होऊन त्यांचीं लोकांनीं शतशः पारायणें करावीं, आणि खऱ्या ऐतिहासिक माहितीनें ओथंबलेल्या कारकीर्दींतील एका प्रतापी

महापुरुषाच्या चरित्राच्या नांवाचें लहानसेंही एकादें पुस्तक प्रकाशित होऊं नये, हा दोष कांहीं लहानसान नाहीं. असो.

वरील दोषापासून यथाशक्य दूर व्हावें, या हेतूनें हें लहानसें पवाड्याचें पुस्तक छापून प्रकाशित केलें आहे. हा पवाडा, **शिरोडें** ता० वेगुर्लें येथील रहिवासी रा. रा. **नरहर व्यंकाजी राजाध्यक्ष ऊर्फ नाना हवालदार** यांच्या संग्रहीं अगदीं जीर्णावस्थेंत होता. तो जशाचा तसा लिहून व आवश्यक जागीं टीपा देऊन छापून काढिला आहे. काव्य दृष्टीनें पाहतां या पवाड्यांत कांहीं विशेष नाहीं, परंतु ऐतिहासिक दृष्टीनें हा पवाडा इतिहासभक्तांस परमोपकारी झाला, असें वाटल्यावांचून राहणार नाहीं, अशी आशा आहे, ती परम समर्थ जगदंबा पूर्ण करो.



बक्षीबाहाद्दर जिवबादादा केरकर.



श्री गजाननप्रसन्न.

बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर यांचा पवाडा.

जिवबादादा खरा रणधीर ॥ जगीं गाजली जयाची विजयी तलवार ॥ धृ० ॥ काय सांगू बालक ल्हान बुद्ध थोर ॥ कुटुंबाची प्रीत होती फार ॥ निजला सदरेवर तेथें दिसला स्वप्नचमत्कार ॥ उठ उठ बाळा हो हुशार जा हिंदुस्थानिं सत्वर ॥ चौदा वर्षांचा बाळ परी पोक्त फार ॥ आईबापां सांगे विचार ॥ जातों हिंदुस्थानीं निघुन लौकर देवें दिला वर ॥ आईबाप ह्मणत तूं आमुचा धुरंधर ॥ जातोसी कुटुंबा टाकुनी निराधार ॥ १ ॥

कांहीं दिवस जातां तेंच स्वप्न प्रत्यक्ष बाळ झाला जागृत ॥ ह्मणे आतां न राहूं गावांत ॥ येथें देव नाहीं सानकुलित ॥ (चाल) पुन्हां सांगे आईबाप भावांस ॥ तुह्मी रहा केरी[1] गांवांत ॥ आह्मी जातों उत्तरप्रांतांत खेद नका धरूं चित्तांत ॥ तेथून निघुन गेला मळगांवांत[2]

---

१ केरी हा गांव हल्लीं गोवें प्रांतीं फिरंग्याचे ताब्यांत आहे. पूर्वी सावंतवाडी सरकारचा होता. हे तेथें राहत तेव्हां त्यांस केरकर म्हणत.

२ मळगांव हा गांव सावंतवाडी जवळ आहे.

बहिणीच्या घरांत ॥ भेटला बहिणिस सांगे वृत्तांत येतों क्रमून दुर पंथ ॥ बहिण बहुत होय दुःखित जिवबा समाधान करीत ॥ जिवबा०॥ २ ॥

जिवबादादा सरळ चालिले उत्तर पंथ ॥ तेथुनि गेले कोलापुरांत ॥ चाकरी धरिलीसे नगरांत ॥ त्या छत्रपती राजसभेंत ॥ तेथें मराठमंडळ खास ॥ वर येण्या मार्ग न दिसत ॥ तेथुनि चालिले उत्तर पंथ ॥ आले पुणें शहर बरव्याचे गोटांत ॥ लागली दाद झटकर तेथ ॥ (चाल) ह्मणती कोण तूं उमदा सरदार ॥ सांग आपुलें नांव गांव साचार ॥ रहा येथें देतों तुला विचार ॥ (चाल) मग दादा बोले त्यांसीं ॥ आह्मी कोंकणचे रहिवासी ॥ आलों हेत धरुनि रहावयासी ॥ कथियलें सर्व स्वप्नासी ॥ काय सांगू आतां तुह्मांसी साधून देईन ज्या विजयासी ॥ (चाल) असें ह्मणून आवेश दावून ॥ लुब्ध सर्व केले ॥ मग बरव्यांनीं तयां ठेविलें ॥ ३ ॥ जिव०

इतक्यांत वेळ आला श्रीमंतांचा ॥ वांकेनिस गेला ॥ हुषार मनुष्य पाहिजे झाला ॥ त्या कामावर दादा

---

३ विविधज्ञान विस्तार पुस्तक ११ सन १८७९ अंक जून, जुलई, आगष्ट मिळून यांतही असाच आधार मिळतो.

४ मुदपाक खान्यावरील मुख्य अमलदार यास वांकनीस म्हणत.

नेमिला ॥ मात झाली हुषारीला ॥ मग श्रीमंतांला खासगीवाला भला शोभला ॥ दिवसें दिवस मर्जी बहाला ॥ ऐसा मनुष्य नाहिं देखिला ॥ आनंदानें ह्मणती जिवबाला ॥ दादा दादा यावें कामाला ॥ सर्वांच्या तोंडांतिल नाहिं खळला ॥ सकल आश्चर्य करिती हुषारीला ॥ ४ ॥

पुण्यामधीं महादजी शिंदे एक वेळे ॥ नानासाहेबांस भेटण्यास आले ॥ (चाल) मग त्यांस राहून सर्व भले सरदार मिळवून ॥ सोमवार दिवशीं मुलाखत करुन ॥ सरबराई करुन ॥ रात्रिं घेतलें पंक्तिसी शिंदे यांसि स्मरून ॥ (चाल) जेवण मराठ मंडळाला तिखट खारट आंबट ठीक ॥ परंतु त्यांत नाहीं तिळचटणी डांगर पीक ॥ (चाल) ॥ जेवण चालिलें गोष्टि लावून ॥ मग आठवण केली जिभेनें येऊन ॥ ताट पाहती शिंदे टवकारून ॥ दिसली तिळचटणीची वाण ॥ मग महादजीनें सहज ह्मणून वांकनिसाकडे पाहून ॥ जाणिलें जिवबांनीं पाहण्याचें कारण ॥ हुषारीचें हेंचि लक्षण ॥ जाणती मनिचें विचक्षण ॥ (चाल) ॥ बोलिले दादा हें माहित ॥ परी सोमवार ह्मणुनी केलिरहित ॥ ऐसें गुह्यार्थ बोलणें करून महादजी हर्षविला त्यांत ॥ ५ ॥

वाकनिशीचें काम पाहुनी लष्करच्या रीती ॥ सवड काढुनी दादा तेथें नित्य पाहत राहती ॥ शूर शिपाई घोडे हत्ती आवड त्यांवरती ॥ भाला बर्ची

तरवार बंदुका तोफांची प्रीती ॥ घोड्यावरती स्वार होउनी चपळाई बहुत दाविती ॥ तरवार परजून म्यान करुन भाल्याची फेंक दाविती ॥ रणशूर सामने-वाला होऊनि त्या दाविती ॥ कसब ते शूराचें या रीती ॥ (चाल) ऐसी दादांची करणी बहुगुणी लहानपणापासुनी ॥ तिस वर्णवेना आमच्या एकटे मुखांनीं ॥ ६ ॥

पुढें श्रीमंत साहेबांची स्वारि गेली वसई किल्याला ॥ बरोबर नव्हतें कोणी हुशारीला ॥ तेव्हां घेतलें जिवाजिबल्लाळदादांला ॥ भला शोभला सरदार ब्राह्मण बादशाला ॥ ऐसे मिळुन गेले वसई किल्ल्याला ॥ फिरंगी मोठे झुंजार सच्याला ॥ पण दादा आहेत हें नकळे त्या मूढांला ॥ (चाल) नंतर लढाया आले उभयांचे जय अपजय झाले ॥ परंतु शेवट पेशवे नाहीं ढळले ॥ फिरंग्यांचे लोक कैद केले ॥ चाल ॥ त्यांत बहुरुपी सुंदरशी मिळाली कामिनी ॥ श्रीमंतांनीं आणुनि ठेविली सदनीं ॥ चाल ॥ लढाइ होत आहे ॥ जय श्रीमंतांचा दिसताहे ॥ पण पर स्त्री आणिली त्यानें पातक आहे ॥ (चाल) मग पराभव

---

५ जिवबादादांचें नांव जिवाजी बल्लाळ सजगिरे केरकर असें होतें व ही फिरंग्या बरोबर दुसरी लढाई होती.

६ जिवबादादांनीं फिरंग्याचे लढाईत जय मिळविला, पहा वि० वि० विस्तार

येईल चालून ॥ हें जाणिलें जिवबादादानें धोरण ॥ ७ ॥
मग लौकर सेना साहेबांस बोलावून ॥ सांगे दादा रागावून ॥ कशास आलां मालक होऊन ॥ आह्मी जातों वसई सोडून ॥ यश कसें येईल परस्त्री आणून ॥ (चाल) ऐसें बोलतां श्रीमंत झाले चकित ॥ ह्मणती सरदार बिथरल्या होईल कीं घात ॥ (चाल) जाणून ह्मणाति आह्मांशी शांतचित्त ॥ जिवबा सांगगा युक्ति यांत ॥ आह्मी कसे होऊं युद्धि जयवंत ॥ (चाल) मग जिवबानें त्या स्त्रीस आणवून ॥ बहुमोल लेणी लुगडीं लेववून ॥ पाठविली फिर्ग्यांकडे पालखीत बैसवून ॥ ती आनंदीत होऊन भेटली भ्रतारासि जाऊन ॥ (चाल) फिरंग्यानी पूर्वी मसलत केली होती ॥ जबर लढाई ते करूं ह्मणती ॥ बायका गेल्या हिंदुचे हातीं ॥ वांचुन काय मरुं मारूं ह्मणती ॥ इतक्यांत बायको पोंचली तेव्हां आनंदित होती ॥ (चाल) पुढें त्या बाईनें हिंदुनीत सांगितली ॥ ह्मणत तुमचें कांहीं नचले सकळीं ॥ मग लढाई संपली किल्ला आला हातीं ॥ हें पाहुनी श्रीमंतदादा शूर मुत्सद्दी ह्मणती ॥ जिवबादादा खरा० ॥ ८ ॥

---

७ ही माहिती पुष्कळ जुन्या लेखांत आढळते, व इतिहासांतरीं तर प्रसिद्धच आहे

पुढें आलें अरिष्ट म्हैसूरची लढाई ॥ राज्याचा उमराव हैदरअल्ली ॥ इकडील मुख्य गोपाळराव हरी ॥ पण सैन्यांत जिवबादादाची बहादरी ॥ ऐसे ऐसे झुंजार असुनी अल्ली काय करी ॥ बावन लक्षांचें सोनें त्यानें दिलें खंडणी लौकरी ॥ एणे-परी पश्चिम आणि दक्षिण दिशा जिंकिल्या दो-नी झडकरी ॥ हें नांव गाजे जिवबादादा केर-करीं ॥ राहिल्या दिशा पूर्व आणि उत्तरी ॥ तेथें गेले भाऊ आणि विश्वासराव निर्धारीं ॥ त्यांचे खातरींत नसे अहमदअबदाली वैरी ॥ (चाल) मोंगल मारुनि गर्वा चढले ॥ पानपतींही शूर मारिले ॥ परी अबदालीची चढती न कळली ॥ अबदालीनें झोड उडविली ॥ फौज मराठी लंबे केली ॥ दुराणीची फत्ते झाली ॥ गनिमी फौज गारद केली ॥ दक्षिण दुःख समुद्रिं बुडाली ॥ ९ ॥

मोडले शिंदे राहिले महादजी बावा ॥ त्यां-ना सुभा न बावा दादासाहेबांचा कावा ॥ सु-भेदार नेमित होते नारोशंकराला ॥ हें मानलें नाहीं राघोराम पागे जिवबादादाला ॥ त्यांनीं नानासाहेबांस विचार सांगितला ॥ आह्मी कदीम अभिमानी शिंदे-शाईला ॥ नेमितां नये नारोशंकराला ॥ मुळ शिंदेशाई

---

८ ग्रांटडफकृत बखर गोपाळराव हरीचें सैन्य कर्नाटकांत जातें.

उभी केली रामचंद्र मल्हार भला ॥ शिंद्याचा वंश बुडाला तरी आहेत महादजी वंशाला ॥ तेच धनी मानूं आह्मीं त्याला ॥ इतक्यांत नारोशंकर ग्वालेरींत वाडा बांधु लागला ॥ हें कळलें जिवाजीरावांला ॥ त्यांनीं दरडाविलें त्यांला ॥ तुह्मी भट्ट येथें कसे याल कामाला ॥ येथें आहेत रजपुत झुंजायाला ॥ ते ठाऊक आह्माला ॥ मग नारोशंकरानें गाशा गुंडाळिला ॥ आला पुणें शहराला ॥ मग श्रीमंतांनीं केले धणी महादजी शिंदेशाहिला ॥ दिलें मुत्सद्दी संगें जिवबा-दादाला ॥ दोन वर्षांनीं दादांनीं मग पुन्हा स्वारि केली अटकेला ॥ (चाल) मधें जाट रजपुत हट्ट रोहिले लठ्ठ ॥ मारिले सर्व जिवबा छातिचा धट्ट ॥ घेतल्या बहु राज्याच्या नगऱ्या सत्य ॥ मारिला ग्वालेरच भृत्य ॥ (चाल) उदेपुर, जोधपुर धोलपुर, जयपुर, भरतपुर, कोटा आदि सर्व ॥ घेतली खंडणी साठ लाख भरपूर ॥ नांव करुन दिलें महादजी शिंद्याचें थोर ॥ परी शिंदा नाहीं एकाही मोहिमेंत हजर ॥ (चाल) कारण ठाऊक पानपत नगरांत ॥ पाय तुटला जरबेंत ॥ तेव्हां महादजी पडला विचारांत ॥ नाहिंतर कर्ता धर्ता शूरांत ॥ १० ॥

या भरत पुरांत ग्वाल्हेर किल्ला अचाट ॥ तो घेतला दादानें अवचित ॥ कळली मात दुनियेंत ॥ मग राव सर्व भयभीत ॥ देऊं ह्मणती मेजवानीचा

थाट ॥ अशा मिळाल्या खंडण्या लक्षकोट ॥ काय सांगु त्याची मात ॥ (चाल) हें आवडेना अंबोजी इंगळ्यास ॥ तो मनीं चडफडत खास ॥ (चाल) कारण महादजी, दादाचे सल्लयांत ॥ सर्व मनसबा त्याचा होत ॥ परी कळेना अंबोजीस दादाचा अंत ॥ हुशार शहाणा शूर मुत्सद्दी आहे सर्वत्र ॥ हें समजेना इंगळा सत्य ॥ तेव्हां मनांत आला कलह साद्यंत ॥ ह्मणुनी इंगळे बांकुनि वागत ॥ हा समजुनि महादजी बावांनी वक्त ॥ अंबुजीसी पाटीलबावा ठेविती जरबेंत मग दादांपुढें कोणाचा काट न चालत ॥ ११ ॥

सर्व सेना एक वटोनी दादांस ह्मणती हा आमचा नाथ ॥ किती त्यांचे गुण आणुं ह्मणती लक्षांत ॥ तेथुनी गेले दिल्लीचा पंथ महमदबादशहा केला दिल्ली तक्तांत ॥ त्यानें श्रीमंतांसह दिली बक्षीकिताबत ॥[९] पाहुनी श्रीमंत ह्मणती जिवबादादा गुणवंत ॥ जिकडे तिकडे प्रताप जिवबादादांचा गाजत ॥ यापरी सर्व राज्य महादजी दादाजवळ देत ॥ आपण मथुरे बैसुनि

---

९ सन १७५९ साली महादजी शिंदा बरोबर जें सैन्य उत्तर हिंदुस्थांत गेलें त्याचे सेनापति जिवबादादाच होते आणि त्याच वेळीं दिल्ली बादशहाकडून पेशव्यांस वकील मुतालिक किताब मिळाला. पहा ग्रांटडफ कृत खबर.

हुकुम सांगत ॥ त्यांस मिळाले सोहिरोबा आंम्बिये पूज्य साधुसंत ॥ सदैव मुखें कृष्ण कृष्ण म्हणत ॥ यापरी पुण्यास लावून दिले खंडणीचे भारे उंटावर्त ॥ आणि राज्य मिळविलें शिंदेशाई केली तीन कोट ॥ दादांची बुद्धि किती सांगूं अचाट ॥ (चाल) स्वारी केली जिवबानें जयावर पराभवचि त्याला ॥ रजपूत जाट रोहिले मुसलमान कांपति जिवबाला ॥ मग तो उज्जन सोडून ग्वाल्हेरीस आला ॥ तेथें राक्षसभुवन राहण्यास जागा केला ॥ सभोंवार होते पुष्कळ रजपुत शूर वाघ ठेवुन बाजूला ॥ तो प्रांत जिवबास पाहून गर्भगळि झाला ॥ १२ ॥

यापरी शिंदा सत्य सिंह नांव पावला ॥ सर्व हिंदुस्थानांत त्याचा विचार घेती आपल्या राज्याला ॥ लाख घोडा चार लाख तोडा लाख मोर्चा शिंद्यास जमविला ॥ हें नांव गाती जिवबादादांचें शनि ठाउक सर्वांला ॥ हिंदुस्थानांत एक राजा नाहीं सामन्यास उरला ॥ मग पेशव्यांनीं आपसांत कलह मांडिला ॥ राघोबादादा गेले इंग्रजांकडे मदतीला ॥ ते खुषी झाले हात रिघवायाला ॥ पार समजेना

---

१० सोहिरोबाचें दुसरें नांव मल्लिनाथ असें होते व महादजी संम्बधानें सोहिरोबांनीं कविताही केल्या आहेत पहा आंबिये कृत पदसंग्रह पुस्तक

जिवबादादा आहेत त्या पक्षाला ॥ (चाल) मग लढाया आरंभिल्या लवलाह्या ॥ त्यांचा मोड केला सर्व फिरुनियां ॥ मरूं ह्मणती न येऊं फिरूनीयां ॥ झाल्या बडगांवाला तह सया ॥ आह्मी जातों ह्मणती तिनठाया[११] ॥ (चाल) मग सोडिले इंग्रजवीर ॥ जिवबादादांस देती नजर एकेचाळीस हजार ॥ यांतुन आम्हास सोडा लौकर ॥ येती काकुळती दिला दादांनीं मार ॥ १३ ॥

इतक्यांत आला घाला शहाअलम दिल्ली बादशहावर ॥ इस्मालबेग मन्यार सिंग रोहिला गुलाम कादर ॥ हे मिळुन लहान थोर ॥ करूं ह्मणती बादशहा लहान पोर ॥ चाल ॥ हें कळलें महादजीला ॥ मग त्यावर जिवबादादा रोखीला ॥ तो ह्मणे दाविन जलदि हात त्याला ॥ जरासंधवत् भेरी वाजती गर्भिणी टाकिति गर्भाला ॥ मग स्वारि केली नेली दिल्ली राजवाड्याला ॥ तेथें जाउन पाहिलें बादशहाला ॥ हर हर रोहिल्यानें अगदीं अंध केला ॥ हें वाइट वाटलें जिवबादादांला ॥ तो ह्मणे दांत कुरकुनी बादशाहाला ॥ आणिला धरून असता नजरे समोर शत्रूला ॥ पण डोळे गेले काय करूं देवाचे करणीला ॥ बरें जातों शत्रु आणितों

---

११ तिनठाया ह्मणजे कलकत्ता, मुंबई आणि मद्रास या तीन ठिकाणीं असें ह्मणण्याचा कवीचा उद्देश दिसतो,

मग पाहा हो हात लावून त्याचे अंगाला ॥ मग शत्रु भिऊन जिवबादादाला ॥ शिलिमगडा[12] खालीं उतरून पटपट[12] गडास राहिला ॥ यमुनेस पाणी फार मित नाहीं जळाला ॥ उतार नाहीं अंतरवेदी प्रांताला तेथें रायाजी पाटील सरदार आला ॥ त्यानें जवळ केलें देवबा गवळ्याला ॥ परि सार्थक न झालें लढाईला ॥ (चाल) मग जिवबादादा येऊन ॥ त्यांस यमुना बाईनें उतार देउन ॥ किरावळीचा घांट घोड्यानिशीं चढून ॥ आले लढत लढत मेरटेच्या[13] आसरास जकड बंदी करून ॥ (चाल) हें पुण्य जिवबादादाचें ॥ त्यानें शिंद्याचें शिखर केलें दौलतीचें ॥ काय सांगु त्या लढाईचें ॥ असें केलें शत्रुस जर्जर कांचें ॥ शरिराची शुद्ध नव्हती त्यांचे ॥ मग रात्रदिवस जिन घोड्यावरि हिशोब शत्रूचे ॥ मोठी लढाई देऊन केले प्रत्यत्न शत्रू जिंकायाचे ॥ अर्ध लाख फौज ती कापुन काढिली नांव झालें शिंद्याचें ॥ (चाल) मग गर्वसेग-[13]डाचे अंगानें सरदार थोरले ॥ गुर्जरानिका[13] कडुन पळून गेले ॥ तेव्हां ते गुलाम कादर शहाजादे नाझर-खा मन्यारसिंग या सर्वांस धरीलें ॥ शहाआलम बादशहा समोर त्यांस उभें केलें ॥ डोळे नाहींत त-री शिर त्यांनीं वर नाहीं केलें ॥ १४ ॥

---

१२ शिलिमगड, पटपटगड, हे दिल्लीच्या जवळ किल्ले आहेत.

ही हिंदुपद दिल्ली बादशाही दादांनीं राखिली मूळ ॥ ह्मणुनी त्यांस बादशहानें दिला अंतर्वेदी प्रांत समूळ ॥ त्याला शोभेसा किताब दिला बक्षीबहाद्दर कुळ ॥ महादजी बावास किताब दिला अलिजाबहाद्दर सीळ ॥ श्रीमंत पेशवे यांशीं आणिली वकील मुतालिक दूल ॥ सावंतवाडीचे राजे दादांसि तें सुवासिक फूल ॥ त्यांसी आणिला किताब सरदेसाई राजेबहाद्दर तूल ॥ चाल ॥ हा सर्व मजकुर पसंत जाहला ॥ परि हें नाहीं आलें कोल्हापूरकरांच्या मनाला ॥ ते ह्मणती वाडीकराला ॥ तुह्मी मराठे कसे राजेबहाद्दरीचे कामाला ॥ आमचे कुळांत शिवाजी छत्रपती महाराज झाला ॥ तुह्मास मोर्चेलें कोणीं दिलीं सांगा आह्माला ॥ ही गोष्ट तुह्मी ठीक करित नाहीं साक्ष अंबेला ॥ आह्मी तुह्मास मोर्चेलें छत्र घेण्यास नाहिं देत चला चला उठा लढाईला ॥ आह्मी ऐकणार नाहीं तुमच्या सरदाराला ॥ पाहूं पाहूं आह्माशीं कसे भिडतां त्याला ॥ महाराजांनीं हुकुम केला डुगळ सरदाराला ॥ सावंतवाडी आण उठेवून कोलापुराला ॥ तें स्थान देऊंगा इनाम तुजला ॥ जा घेऊन ये सरदेसायाला ॥ असा पैजेचा विड उचलून आला डुगला ॥ परी सावंताची करामत न कळे त्या वेड्याला ॥ राज्यांत बसून पत्र लिहून धाडिलें जिवबादादांला ॥ सांडणी स्वार आले चौथ्या दिवशीं कोल्हापूराला ॥ द्या द्या राज्य ह्मणती महारा-

जाला ॥ नाहीं तर कोल्हापूर ह्मणून समुद्रात टाकुं ह्मणती जिवबादादा तुह्माला ॥ आह्मी तों दादांचे खास नोकर जासुदवाला ॥ सांभाळा दादा तर येत नाहीं तुमच्या पारपताला ॥ इकडे कोणास ही छू केलें तर मग सांभाळा आपल्या राज्याला ॥ जिवबादादा आले तर त्याच्या बड्या फौजेला ॥ तुमचें राज्य पुरणार नाहीं मसाल्या चांदिला ॥ धाडिलें पत्र दादांनीं नानाफडणीसाला ॥ तो करील तुमच्या पारपताला ॥ मग महाराजांनीं विचार केला ॥ राज्य राखावें दादाचा भाला ॥ (चाल) जिवबादादा येईल करील घाला राज्य नेईल ॥ मारिल घोड्याच्या टापा सरसा ॥ मग दुसऱ्याचें राज्य घेणें राहिल आमचा जाईल परसा ॥ असें ह्मणून विचार करून सोडून दिला अभिमान परता ॥ असा तोषविला जिवबादादांनीं खेम सावंता ॥ असा मान आणि त्यावर दिली जनकोजी शिंद्याची सुता ॥ (चाल) मग ह्मणती खेम सावंत महाराज राजेबहादर सरदेसाई ॥ लोक येती पाहण्या स्वारीचा थाट सरबराई ॥ १९ ॥

इकडे नानाफडणीस चतुर गाजला ॥ सर्वांनीं हुकुमांत रहावेंसे वाटे त्याला ॥ परि जिवबादादा मुत्सद्दी त्यावरला ॥ हें समजेना त्या नानाला ॥ काय सांगावें दादाच्या कल्पनेला ॥ एकवेळ महादजी शिंद्याकडे हिशोब मागितला ॥ तो जिवबादादांनीं,

नानास सांगितला ॥ जणूकाय लिलावती पाठ केली आहे हें तो समजला ॥ हें गूढ कळेना त्याला ॥ मग आर्जवानें पन्नास लाख रुपया मागितला ॥ महादजी ह्मणे पैसा नाहीं आमचे खजिन्याला ॥ नाना ह्मणे तर मग तुह्मी रात्र काशाला ॥ महादजी ह्मणे आह्मी शोभलों चार रत्नाला ॥ त्या रत्नाची किंमत करण्याला ॥ कोणी समर्थ नसे या दुनियेला ॥ रत्नें आहेत आह्माकडे मागतों तुह्माला ॥ नावें ऐकावीं तुह्मीं व्हा सादर त्याला ॥ जिवबा[१३], लखबा, बाळोबा, सदोबा सरदारांला ॥ हीं नावें आहेत चार रत्नाला ॥ तर मग नाना ह्मणे काय उणें पन्नास लाखांला ॥ इतकें ऐकुनी महादजी बोलण्यास विसरला ॥ मग महादजी देण्यास फसून कबूल झाला ॥ तें मनास आलें नाहीं मुत्सद्यांला ॥ ते ह्मणति तुह्मी उगीच शब्द दिला ॥ (चाल) परि शब्द राखून आह्मी देतों त्यास परस्पर पैसा झांकून ॥ मग ही चतुराई कोणास समजेना अवलोकुन ॥ त्यावेळीं लढाई चालत होती इंग्रज टिपु सुलताना मधून ॥ हें जाणे जिवबादादा सुंदर निदान ॥ मग त्यांनी बांधिलें उत्तम शरसंधान ॥ टिपुस पाहिजे झाली मदत बरें निशान ॥ (चाल)

१३ म्हणजे जिवबादादा, लखबादादा लाड, बाळोबा तात्या पागे, सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण हे होत.

हें कल्पिलें मनी त्यांनीं ॥ मग जासुद आणविले मधचे मधे बोलावूनी ॥ त्यांनीं बोलाविले महादजी तीनदां रणांगणी ॥ ऐसी मसलत उत्तम केली हें नकळे नाना आणी महादजी आदि कोणीं ॥ मग सर्व दळ एकवटोनी ॥ डेरे राहुल्या वानवडीहुन काढोनी ॥ चालली शिंदे सेना कर्नाटक रस्त्यानें ॥ (चाल) हें ठाउक झालें इंग्रज पुणें वकीलाला ॥ तो दादांचे स्वारिस मनीं भ्याला ॥ ह्मणे हें कटक पडेल टिपूला ॥ तर मग जावें लागेल विलायतला ॥ ह्मणूनशानि दोन कोट रुपया बोलला ॥ ही देणगी महादजी शिंद्याला ॥ मग मानलें जिवबादादांला ॥ ते ह्मणती परंतु पुन्हा वानवडीला ॥ आपलें कामनाहीं पुढें जाण्याला ॥ त्या दोन कोट रुपये गणतीला ॥ केले भागपहा त्या दादाचे कल्पनेला ॥ एक कोट घेतले रोखीला ॥ अर्ध कोट कलकत्ता तिजोरीवर रोखा हुंडीला ॥ राहिले पन्नास लाख ते दिधले नानाचे मागणीला ॥ तो नानाचा हवाला घातला इंग्रज वकिलाला ॥ दिडकोट रुपये गणतीला ॥ जिवबादादांनीं शिंद्याचे कोठारास टाकिला ॥ हें मधचे मधें घडलें ठाउक नसे कोणाला ॥ दिडकोट रुपाया मात्र मिळाला शिंद्याच्या कबजाला ॥ मग खोटी गोष्टती कशी राहिल गुप्तला

॥ आणि मुद्दाम फोडण्यांत अर्थ होता बहु तीला ॥ कारण पेशव्यांची मागणी नानाचा हवाला ते- व्हां मग बुडाला ॥ हा खरा मुत्सद्दी जिवबा दा- दा आहे हें समजलें मग त्याला ॥ चार रत्नाची पारख समजली मग त्याला ॥ कांहीं सुचेना नानाला ॥ मन- चेमनीं चरकला ॥ पन्नास लाख रुपये न देतां पर- भाराला ॥ जिवबा दादांनीं महादजी साठीं आपली रत्न पारख कळविली न देतां कांहीं नानाला ॥ मग नानाचे चतुराइला ॥ दादा पुढें मेळ नाहीं प- डला ॥ तेव्हां पासुनि नाना फडणीसाला ॥ अर्धा शहाणा हें नांव ठेवुं लागले तिन शहाणे त्याला ॥ कारण काय हें समजुनि घ्यावें वरच पारितो फसला ॥ अशा दादाच्या किति सांगु मुत्सद्दीगिरिला ॥ (चाल) हे होते हिंदुस्थानी हुषार ॥ त्या पुढें काय करिल नानाफडणीस पुणेंकर ॥ १६ ॥

या परी जिवबादादावरी कोणी न पाहे नजरेला ॥ पण नानाफडणीस मनीं बहुखिन्न झाला ॥ कारण का- य पहा पूर्वी फसला तो अपमान झाला ॥ ह्मणूनी दादाचा स्नेही तुकोजीराव होळकर भला ॥ त्यासी नानफडणीसानें फोडिला ॥ हेंच सुख वाटलें त्या नानाचे मनाला ॥ मग दर हमेश लढाइला ॥ शिं- देहोळकर जमूं लागला ॥ पण झालें आश्चर्याला ॥ जोंवरि होते जिवबादादा तोंवरी होळकर नाहीं क-

धीं जयवंत झाला ॥ आणि विरोध वाढला शिंदेशाई आणि पेशवाईला ॥ मग झालें रणकंदन यांत रणशुर बहादरीला ॥ आणि मुत्सदी कारकुनीला ॥ जिवबादादा मागें नाहीं सरला ॥ (चाल) मग सर्व रजपूत शिक आणि रोहिले जाट ॥ रोगडे, भिल्ल, गोंड, कोळी पेंढारी ॥ आणि फिरंगि इंग्रज फ्रान्स टोपी वाले रामोसी घट्ट ॥ [चाल) हेसर्व भिती सेनापति जिवबा दादांस ॥ त्यांनीं शिंद्याच्या दरबारास ॥ शोभविलें नांव झुंजार आणि शूर ह्मणुनि खास ॥ पण आंतील व्यंगितार्थ माहित केवळ जिवबादादांस ॥ लाख घोडा दोन हजार तोफा बाण आणि भाल्या तरवारीस ॥ सांड पायदळ हत्ती घोडे बैल आणि रथ गाड्यांस ॥ हे खर्च माहिना लागे एक कोटीस ॥ खंडण्या परस्पर घेउनी भागविलें खर्चास ॥परि सर्व खर्च भागेना कटकास ॥ ह्मणुनी आपुल्या हिंमतीनें खंडणी व साहुकारी कर्जास ॥ आणि आपले दागिने ठेवुन व्याजास ॥ भागविले सैन्य खर्च आणि मिळाविले राज्य आणि नांवास ॥ १७ ॥

---

१४ जिवबादादा शिंद्याचे प्रसिद्ध सेनापति होते. पहा हिंदुस्थानांतील सर्व संस्थानचा इतिहास. इंग्रजी ग्रंथावरून गोडबोले यांनीं केलेलें भाषांतर व आकूवर्त साहेबांनीं करविलेलें पवाड्याचें पुस्तक.

देश जिंकिले पंजाब सिंध दिल्ली बंगाल ॥ खानदेश गुजराथ हिंदुस्थान आणि बंडोळ[15] ॥ ही कीर्ति सुकाळ जाहली सर्वत्र ॥ त्या नंतर महादजी राणोजी शिंद्याचे बाळ ॥ हिंदुस्थान सोडुनि आले[16] दक्षिण शेवटाळ ॥ निजाम अल्ली जवळ राहिली खंडणी ही फिर्याद ॥ सवाई पेशव्यानें सांगितली सर्व ॥ मग महादजीनें खंडणी म्हणोनी मागितली खर्व[17] ॥ ती नवाबास न देववे राज्य विकुनि सर्व ॥ म्हणुनि पांसष्ट लाख रुपये देउनि केला आर्जव ॥ यावर वानडीस स्वर्गस्थ झाले महादजी राव ॥ मग निजामअल्ली मश्रउलमुखास आला गर्व ॥ म्हणती राहिला एक दादा तो पाहिजे हिंदुस्थानांतील राजांचे छातिवर ॥ आणि महादजी नंतर गादीस नव्हता वारस कोणि भरपूर ॥ (चाल) हें समजुनि चित्तीं ॥ नवाब आपसांत बोलती ॥ आपली फिटली खंती ॥ आतां पुणें शहर लुटूं भाल्या-

---

१५ बंडाळ म्हणजे बंड असावीं.

१६ दिल्लीच्या बादशाकडून पेशव्याकरितां वकील मुतालीक पदवी मिळविलेली देण्यासाठीं महादजी शिंदे दक्षिणेस आले. त्या वेळीं आपलें सर्व राज्य सांभाळण्यासाठीं हिंदुस्थांत जिवबादादांस ठेविलें होतें. गोडबोलेकृत सर्व संस्थानचा इतिहास यांतील ग्वाल्हेर संस्थानची माहिती पहा.

१७ खर्व ह्मणजे पुष्कळ खंडणी मागितली असा अर्थ असावा.

बरती ॥ इकडे समजले जिवबादादा चित्तीं ॥ त्यांनीं दौलतराव शिंदा आणवुनी केला तर्क्ताधिपती ॥ त्यास नानाफडणीसानें केली आडकाठी ॥ दौलत रावास दिलीं नाहीं वस्त्रें दादावरी जळफळती ॥ ती न मानितां दादानीं खंती ॥ दिली झुगारुनि सर्व वरती ॥ यापरि नवाबाचे खंडणीला आल्या होत्या हरकती ॥ (चाल) पण देवाचे करणीला ॥ कोण तकुब ठेविल तीला ॥ निजामास गर्व जाहला ॥ तो उतरला सगळाला (चाल) ही सर्व तयारी करुनी ॥ चवदा वर्षांचा बाळ दौलत राव आणिला लढाई लागुनी ॥ कारण कार्यंत पाहुनि ध्यावें मनांतुनी ॥ महादजी नंतर खंडणीची चिंता निजामानें दिली झुगारुनि ॥ (चाल) हें मानलें नाहीं जिवबादादांला ॥ तो पक्का शुरांतिल राजा वहिला ॥ आणि नाना फडणीसाचे विनवणीपत्राला ॥ मान देण्यास तो कुळवान मार्गे नाहिं सरला ॥ (चाल) मग कुचावर कुचेर करून ॥ चाळीस हजार फौज सातशें तोफा घेऊन ॥ (चाल) आला पुणें वानवडी

---

१८ दौलत रावास जिवबादादांनीं महादजी शिंद्या मागून गादीवर बसविलें. मराठ्यांची बखर यांत ह्मटले आहे, महादजीचे मागून त्याचे मुतसद्याने दौलतरावास त्याचे ह्मणण्याप्रमाणे गादीवर बसविलें. याबद्दल जुनही लेख आहेत.

नगराला ॥ पेशवा पुढे आणण्यास गेला ॥ मग फुरसत नसे दादांला ॥ तावडतोब नानाफडणीसानें दरबार केला ॥ त्यांत बैसले शिंदे होळकर पवार भला ॥ आणिक भोंसले गाइकवाड परभु यांनीं थिर केला ॥ श्रीमंताचे जवळ होते रास्त्ये पानसे फडके परशरामभाऊ पटवर्धन यांवर त्यांचा सर्व विल्ला ॥ मांडिले विडे सरदारांच्या हिमतीला ॥ नाना ह्मणे उठा उठा घ्या पदराला ॥ सर्व सरदार रोखदार त्यांचा शिरपेंच दिसला ॥ परी कोणी न उठे पुढें तरवार घेण्याला ॥ जिवबा दादा होते परि त्यांनीं आपला शिंदा मुख्यधनी मानीला ॥ तेव्हां त्यांस उठाया नव्हतें कामाला ॥ परि दरबारांतिल कोणी सरदार उठले नाहित घेउन भाल्याला ॥ मग वाइट वाटलें जिवबादादांला ॥ हिंदुस्थानांत कोणी शूर लढता सरदार नाहीं राहिला ॥ हें मनांत आणुनी तो शूर कधीं न स्वस्थ बसला ॥ सर्व सरदार बैसले दरबाराला ॥ जिवबादादा पुढें त्यांस उठण्या धीर नच आला ॥ कारण तो सर्व लढाईला ॥ सदां पुढें होउनी यशवंत झाला ॥ मग झडकरी उठुनी दादा घेत विड्याला ॥ ह्मणे कोण यांत नाहींका उरला ॥ असें ह्मणुनी पांच विडे दिधले दौलतराव बावाला ॥ आणि ह्मणती शिंद्यानें विडा उचलिला ॥ यापरी जिवबादादा

सदां धन्याचा अभिमानी झाला ॥ हें पुरतें समजलें मग सकळांला ॥ ही गोष्ट झाली खरी परी नाना फडणिसास चुरचुर लागला ॥ तो ह्मणे परशुरामभाऊला ॥ तुह्मी नांव राखिलें नाहीं हें क्षत पडलें माझें हृदयाला ॥ जिवबादादानें विडा उचलीला ॥ हें वाइट झालें तुह्मांआह्माला ॥ ह्मणुनी एकांतीं मनसबा केला ॥ आणि उठून गेले लढाईस न सांगतां दादांला ॥ मग ही चुरेस आली शिंदेशाई सर्वांला ॥ ह्मणती नबाब कसा तो परता बेदराला ॥ ह्मणुन शिंदा ह्मोरा नच झाला ॥ यापरि जिवबादादांचे मनी चुरसे आला ॥ १८ ॥

मग परशरामभाऊ बाबुराव फडक्याला ॥ आणि भोंसुले होळकर आद्य सर्वांला ॥ फोडुन मोहिमे वर जाण्याचा हुकुम केला ॥ (चाल) राव रंभा घाटगे डफळे रुस्तुमखान हे सुभे मोंगलांचे सगळे ॥ त्यांस निजाम अह्निन पुढें केले ते पूर्वींचे तगलेले ॥ हे झुंझार होते मात्र गेल्या फौजे पुढें सगळे ॥ (चाल) त्यांनीं परशराम भाऊंस ॥ आणि बाबूराव फडके होळकर भोंसु-

१९ ही माहिती पवाड्याच्या पुस्तकांत व विविधज्ञानविस्तारांत ही आहे

त्यांस ॥ जखमा केल्या सर्वांस ॥ जारिपटका मुख्य बाबुराव फडक्यास ॥ दिधला होता शूर ह्मणुनि खास ॥ परि तो तगला नाहीं नवाबा सरसा ॥ जारि पटका गेला हातांतून पराभवास ॥ या उपर निजामहि आला हुरुपास ॥ चालिला पुणें शहर लुटण्यास ॥ मग नानाफडणीस घेउन श्रीमंतांस ॥ पळत सुटला मार्गास ॥ पाठविले सांडदूत डांकीस ॥ आतां जिवबादादांवरी धरुन हेतुस ॥ हें घडत नाहीं तर आज पेशवाइ गेली विलयास ॥ मग ह्मणती जिवबादादा नानास ॥ ही वेळ नव्हे बोलण्यास ॥ काय नवाब जिन्नस फेंकुन देइन त्या सर्वांस ॥ मग सांगती आपुल्या फौजेस ॥ नांव राखा शिंद्याचें अलिजाबाहादरीस ॥ (चाल) ऐसें ह्मणुनी नवाबावर घोडे घालूनी ॥ पडले एकदम तुटुनी ॥ सातशें तोफ दिली उडवूनी ॥ दिल्या लाख्या करूनी ॥ (चाल) पाणि बंद झालें ॥ उमराव घोडे हत्ती त्या वांचून मरूं लागले ॥ तेव्हां परशरामभाऊ पटवर्धन फडके नानाफडणीसास जिव आले ॥ (चाल) मग मोंगल खर्ड्यां मधीं घातला ॥ तेथें त्यास जिवबादादांनीं अडकेला ॥ सांगुन पाठविलें नानाला ॥ आतां तुह्मी कोठें आहां धीरधरून सांगा आह्माला ॥ तेथें आणितों निजाम श्रीमंताचे गोष्टीला ॥ चार

दिवस पाणी मिळेना निजाम तडफडूं लागला ।
जवळ होतें बांजरा नदीचें पाणि मिळेना प्यायाला ॥
तेव्हां भीमानदीवर पाण्यास जाऊं लागला ॥
जिवबादादा समूळ त्याचा नाश करण्यास सिद्ध
झाला ॥ मग निकराची लढाई जरबंद लाविला ॥
आणि निजामाचा सर्व मोड केला ॥ (चाल)
ही दादाची करामत पाहुनी ॥ निजाम अल्लीनें
आणिलें मनी ॥ ह्मणे जिवबादादास एक जाहा-
गिर देउनी ॥ जावें येथुनी निघूनी ॥ परि
मानिलें नाहीं दादालागुनी ॥ (चाल) ते ह्म-
णती निजामअल्लीला ॥ पहिल्यानें राज्यीं महादजी
शिंद्याला ॥ माझ्या हस्तें स्थापिला ॥ तेव्हां नानासाहेब
पेशवा ह्मणे मजला ॥ हिंदुस्थानचे सुमेराजे करूं हो तुह्माला
॥ परी रामचंद्रबाबा मल्हार भला ॥ ज्यांनीं उभारिलें
शिंदेशाईला ॥ हें आठवुनी स्मरण मनाला ॥ आ-
ह्मी धरिलें नाहीं राज्याला ॥ त्या उपर मी
राज्यीं दौलतराव स्थापिला ॥ मला राज्य पाहिजे
असतें मनाला ॥ तर मग काय उणें त्या रा-
ज्याला ॥ माझी खासगी फौज आहेरे बारा कं-
पूला ॥ राज्य मला आहेरे दिल्ली बादशहानें
दिलें अंतर्वेदी अठरा लाखांला ॥ शिवाय महा-

२० ही माहिती विविधज्ञानविस्तार यांत ही आहे.

दजी शिंद्यांनीं दिल्या जहागिऱ्या करुनि बहु-मानाला ॥ या मी स्वतः मिळविल्या आहेत या भाल्या वरल्या ॥ हा जिवबा अशानें तुला नाहीं येणार गरजेला ॥ मागून घे आपल्या अपराधाला ॥ तरिच जाशिल एथुनी बेदराला ॥ मग निजामअली धरुनि नम्रतेला ॥ सिक्का कटार घ्या ह्मणे दादांला ॥ उघडी तलवार दिली ह्मणे ठेव माझे गळ्याला ॥ सर्व राज्य आहेरे तुझें हें मान मर्दा ॥ मग ओलिस घेउनी मशीरउलमुल्काला ॥ बत्तिस लक्षांचा मुलुख तोडूनी दिला ॥ तिन कोटी रुपये खर्चाला घेतला ॥ आणि निजामअली बेदरास सोडिला ॥ जाण्याचे वेळीं तो बहुतच श्रमला ॥ कारण बरोबर नाहीं मशिरउलमुल्क आला ॥ मग जिवबादादांस बोलावून सांगो लागला ॥ देतों हातीं तुमच्या जाणा कारभाऱ्याला ॥ मगही होउनि भाक निजाम आणि दादांला ॥ निजाम गहिंवरूनी आला ॥ जिवबादादा सांगती मग त्याला ॥ हा माझा सखा भाऊ आहे हें जाणुनियां तुह्मी चला ॥ देतों पाठवूनी ही आण सांगतों देवाला ॥ या प्रकारें नबाब समजाउनी पाठविला ॥ त्यानें मग दिले घोडे हत्ती आणि पोषाख कंठ्याला ॥ १९ ॥

लढाई फत्ते करुनि खर्ड्याची ॥ चालिली फौज छत्रपती शिवाजीची ॥ रस्त्यांमधुनी वाजती वाद्यें

करणा शिंग तुतारी हत्तीवर नौबतीची ॥ (चाल) आलें पुणेंशहर समोर ॥ लोक पाहती कोण जय फत्ते करणार ॥ होते प्रसिद्ध जिवबादादा रणशूर ॥ त्यांनीं मारिला नबाब खर्ड्यावर ॥ लोक ह्मणती पेशवे हरल्यावर ॥ मग आह्मास येथें नव्हता राहण्यास थार ॥ जिवबादादा पासुनी घर स्थीर ॥ आणि सर्व दौलत मिळाली समग्र ॥ (चाल) नाहीं तर निजाम येउनी आह्मास सर्व लुटुनी ॥ आमचीं माणसें घेउनी ॥ नेता बेदरालागुनी ॥ ही हिंदुची अब्रु दौलत राखिली दादा बक्षींनी ॥ मग सर्व लोक नमुनी ॥ सोन्याचीं फुलें टाकिती दादा बैसविती हत्तिवरि अंबारी ठेवूनी ॥ (चाल) आणि किती एक येती नमस्कार पेशव्यास करिती ॥ ते ह्मणती आह्मी नाहीं नमस्कारास वरती ॥ तुह्मी जाउनी दादांस ओंवाळा आरती ॥ त्यांनीं खर्ड्यावरती आणि हिंदुस्थानांत थोर केलीसे चढती ॥ हें प्रसिद्ध आहे सर्व जगतीं ॥ (चाल) मग दौलतराव बावाला तकुब केलेल्या वस्त्रांला ॥ आणखी नजर जहागिरीला ॥ देउन त्याचे सर्व सरदार तोफखून पाठवण केली ग्वालेरीला ॥ २० ॥

जिवबादादाच्या हाताखालीं बडेबडे रणशूर शिपाई होते सरदार ॥ सांगतों नावें मुख्यरण

पंडत धुरंधर ॥ जगन्नाथराम[२१] लखबादादा लोंडे[२२] आरोबेकर ॥ यसाजीराम[२३]कृष्ण यशवंतराव[२४] भाऊ राजाकेरकर ॥ राघोराम[२५]पागे रामचंद्रगंगाधर[२६]रेवे आरोलकर ॥ नारायणराव[२७]बक्षी साबाजीनारायण[२८] राजाध्यक्ष शिरोडकर ॥ धोंडबापर्गनीस सदाशिव-

---

२१ जगन्नाथराम ऊर्फ जगोबा बापू केरकर हे जिवबादादांचे चुलत बंधु होत. हेही शिंद्याचे राज्यांत मोठे पराक्रमी सरदार असत. पहा. मार्टिनोडिकलाईन मोंगल एंपायर.

२२ लखबादादा यांची माहिती वि. विस्तार व मराठ्यांची बखर यांत ही आहे.

२३ हल्ली ग्वाल्हेर येथें जे आरंबेकर बक्षी आहेत, हे यांचे वंशज.

२४ यशवंतराव हे जिवबादादांचे चिरंजीव यांची माहिती वि. विस्तार यांत व मराठ्यांची बखर यांत पेंढाऱ्यांचे लढाईत शिंद्याचा एक सरदार होता असें ह्मटलें आहे, ते हेच.

२५ राघोरामपागे यांची माहिती, भाऊसाहेबांची पानपतीची बखर व वि. विस्तार यांत आहे.

२६ रामचंद्र गंगाधर हेही सरदार असून यांची माहिती जुने लेख जिवबादादांचे येथे केरीगांवी आहेत, त्यांत सांपडते.

२७ नारायणराव बक्षी हे जिवबादादांचे वडील चिरंजीव यांची माहिती मराठ्यांची बखर वि. विस्तार व पवाड्याचें पुस्तक यांत आहे.

२८ साबाजी नारायण यांची माहिती जिवबादादांच्या येथें व त्यांचे घरीं शिरवडें ता. वेंगुर्लें येथें आहे.

मल्हार[29] शिवबानानां[30] केरकर ॥ सदाशिव[31] रामचंद्र
शामराव[32] भैरव अंतोबा[33] कवठणकर ॥ बाळोबा तात्या[34]
पिंगे यशवंत[35] रावबागळे वेंगुर्लेकर ॥ आणखी होते
गोपाळ[36] राव, जनार्दन[37] मुकुंद आजगांवकर ॥ देवबा[38]-
गौळी रायाजी[39] पाटील शिंदे कन्हेरखेडकर ॥

---

२९ धोंडबा पिंगे पागनीस यांची माहिती मराठ्यांची बखर व वि. विस्तार यांत आहे.

३० सदाशिव मल्हार उर्फ भाऊ दिवाण यांची माहिती वि. विस्तार यांत आहे.

३१ शिवबा नाना केरकर हे जिवबादादांचे धाकटे बंधु यांची माहिती वि. विस्तार व जुने लेखांत पुष्कळ आहे.

३२ सदाशिव रामचंद्र रेघे सुखठाणकर हे रामचंद्र मल्हार उर्फ रामचंद्र बाबा शेणवई यांचे चिरंजीव होत. यांची माहिती भाऊसाहेबांची पानपतची बखर व पवाड्याचें पुस्तक यांत सांपडते.

३३ शामराव भैरव हे आरवलीचे रेघे यांची माहिती जुने लेखांत आहे.

३४ अंतोबा कवटणकर हे जिवबादादांचे येथें पागेवर होते. त्यांची माहिती जुने लेखांत आहे.

३५ बाळोबा तात्या पिंगे पागनीस यांची माहिती मराठ्यांची बखर, पवाड्याचें पुस्तक व वि. विस्तार यांत आहे.

३६ यशवंतराव वागळे यांची माहिती वि. विस्तार यांत आहे.

३७ यांची माहिती जुने लेखांत आहे (गोपाळराव यांची)

३८ जनार्दन मुकुंद राजाध्यक्ष आजगांवकर यांची माहिती जुन्या लेखांत आहे.

३९ देवबा गवळी याची माहिती पवाड्याचे पुस्तकांत आहे

जेकब[४०] दिवाय[४१] जानबत्तीस[४२] शिकंदर[४३] ॥ पिरुस[४४] मुकिर[४५]साहेब फिरंगी पोर्तुगीज शिवोलीगांवचे गोवें-कर ॥ याशिवाय बहुत होते दरखदार ॥ एकांडे शुरसरदार ॥ त्यांचीं नांवें मुख्यमुख्य सांगतों ऐका धीरगंभीर ॥ महाजन [४६]मोदी दाभोळकर कोटणीस पनाळकर ॥ [४७]दंडी दळवी घामापुरकर ॥ होते नहीच्याडकर ॥ नाबर गुळगुळे बोरकर ॥ अ-शीं अशीं पतकें होतीं सरदारांचीं बहुत रणशुर ॥ यापरि सर्व दादा सेनापतिचे हुकुमांत खुश फार ॥

---

४० रायाजी पाटील यांची माहिती मराठ्यांची बखर व पवाड्याचें पुस्तक यांत आहे.

४१ जेकब याची माहिती पवाड्याच्या पुस्तकांत आहे.

४२ दिवाय यांची माहिती मराठ्यांची बखर व पवाड्याचें पुस्तक यांत आहे.

४३ जानबत्तीस याची माहिती जुन्या लेखांत आहे.

४४ शिकंदर याची माहिती जुन्या लेखांत आहे.

४५ पिरुसयास पेरण ह्मणतात, याची माहिती मराठ्यांची बखर व पवाड्याचें पुस्तक यांत आहे.

४६ यांची माहिती पवाड्याचे पुस्तकांत आहे. हे फिरंगी गोव्यें प्रांतांतील शिवोली गांवाहून तोफेच्या कामासाठीं जिवबादादांनीं नेले होते.

४७ महाजन हे वेंगुर्लें येथील; विजापुर सरकारानें दिलेलें हें हुद्याचें नांव आहे. यांचें उपनांव कंटक. हेच पुढें शिंदेसरकारचे मोदी व पिलखान्याचे कामदार झाले.

जिवबादादा सेनापती होते राज्यधुरंधर ॥ आणि करित होते सर्व राज्य मुकत्यार ॥ (चाल) सदां विजय होता जिवबादादाला ॥ त्यांचे स्वारी बरोबर लोक उठती आपुले कार्यी ह्मणति उत्तम शकुनाला ॥ २१ ॥

या शूराचा डंका ऐकोनी ॥ धरिती मार्ग ग्वाल्हेरी लागूनी ॥ त्यांत शुर कारकुन मुत्सदी तीनी ॥ आणि येती गवई तंबुरा लावोनी ॥ (चाल) यापरी सर्वलोक येती अलिजा बाहादरी नगरीस ॥ त्यांत कोंकणप्रांत कुडाळ कारवार बारदेस ॥ यांतिल शूर आणी मुत्सदी सदां पंगतीस दादांच्या सदरेस ॥ ते बहुतच पडले शिंदेशाईचे कामास ॥ त्यांनीं उंटावरूनि द्रव्य आणुनी भरला दक्षिण देश ॥ प्रत्येकाच्या किती सांगु गोष्टीस ॥ त्या ठाऊक महादजी आणी दौलतराव बाबास ॥ हे मानित होते त्या सर्वांस ॥ आणि त्यांस ठाऊक त्यांचे शुर मुत्सदीगिरिस ॥ त्या शिंदे राशिदिस लोक ह्मणती शर्णवीड्तीस ॥ (चाल) त्या शुरमर्दांच्या गोष्टी ॥

---

४८ मळगांवकर यांस दंडी ह्मणतात. यांनीं आपला कांहीं एका कामांत हेका (आग्रह) न सोडल्यामुळें शिद्यांनें त्यांस दंडी असें म्हटलें तेव्हां यांचें उपनांव फिरून लोक यांस दंडी म्हणूं लागले.

४९ सर्वसंस्थानचा इतिहास गोडबोले कृत यांत ग्वाल्हेर संस्थानची माहिती पहा.

ऐकती महादजी आणि दौलतराव होत संतुष्टी ॥(चाल) हें भारत कोणी वर्णित ॥ तरी त्यांनीं ऐकु ह्मणुनी केला हेत ॥ हें कळलें त्यांच्या तोंडानें आह्मा हित ॥ सांगतों ही शिंदेशाई आज आद्यंत ॥ तेथें सर्व गेलेलें सागरांत कांहितरी खपत ॥ ह्मणुनी नांव पावले अलि-जाबहादर हें विराजित ॥ छत्रपती शिवाजी गेल्यामागें हेंच राष्ट्र होतें बहुनीट ॥ काय सांगु ईश्वरभाकीत ॥ ज्याच्या कुळीं पूर्वीं होती शुर मुत्सदी कीर्तिवंत ॥ त्याच्या वंशांत पुढें होतसे भाग्यवंत ॥ जिवबादादा-च्या पूर्वजांत ॥ पूर्वी होते वीर विजयनगर राज्यांत ॥ निलगिरी पर्वता वरतें ॥ तेथूनि नांव पडलेंसे सजगिरी प्रख्यात ॥ २२ ॥

सर्व ठिकाणीं लक्ष होतें दादाचें ॥ राहण्याचें खेडें होतें त्यांचें ॥ मग नरोबाची केरी नांवाचा गांव केला त्यांनीं काय सांगु नांव त्या हवेचें ॥ (चाल) तेथें वडिल बंधु नरोबादादा त्यांनीं गांव केलासे बरवा ॥ ते वाडीकरांस देती मदत बंड धरावा ॥ हें सर्व मनांत आणुनी त्यांनीं केरी हरमल गांव दिले पालखीस ठाउ-क सर्वां ॥ (चाल) पहा पहा त्यांची करणी तयां-वांचूनी न चाले कुणासी वरणी ॥ परंतु थोडें आठव-णीला आणोनी ॥ सांगतों राहिलेली त्यांची स्मरणी ॥ (चाल) स्नेही नातें जात गांववाले शत्रु मित्र ब्राह्मण शुद्राला ॥ त्यांनी दिल्या देणग्या पालखी घोडे जमि-

नी गांव जहागिरीला ॥ मोहरा पुतळ्या कंठ्या पेट्या शिरपेंच तुरे पोषाखाला ॥ परमित नाहीं मोजण्याला ॥ बसल्या ठिकाणीं पत्रें पाठवुनी जासुदांचे जोडिला ॥ कामें केलीं आहेत मोहिमेच्या सारिला ॥ ऐसे वजनदार होते जिवबादादा सांगतों तुह्माला ॥ भारती वीर अर्जुन ऐसें नानाफडनीस आणि शहाणे लोक ह्मणती त्यांजला ॥ नांव ऐकुनि शत्रु भीति त्यांजला ॥ बारिक इतिहास पाहुनि ध्यावा परतुनि बखरीच्या पानाला ॥ हिंदुस्थानांतील सर्व संस्थानिकांच्या राज्याला ॥ शिंद्याकडुन जाहले आहेत तहकार्याला ॥ ऐसें मग तुह्मास दिसेल जिवबादादाभला ॥ स्नेहास मनुष्य कसला होता पहा पहा हो त्यांचे नांवाला ॥ गोंवें वाला इंग्रज भला ॥ फ्रेंच सरदार आणि आनंदराव धुळप झाला ॥ उदेपुर जोधपुरवाला ॥ सिक आणि गुरखा राहिला ॥ असे असे सर्व सरदार जाधव नाईक निंबाळकर माने राणे चवाण भौंसुला ॥ खरोखर होते स्नेही उठ ह्मटल्यावर घेत तरवारीला ॥ काय सांगु पहा त्यांचे पत्र दफतराला ॥ जिवबादादा होते तोंवर मराठीस शत्रु नाहिं दिसला ॥ २३ ॥

नाना फडणीस एवढा शहाणा पारि या जिवबादादा-

ला ॥ एकवेळ त्यानें मारण्यांचा बेत केला सगळाला ॥ पाठवीले मनसबा बोलण्याभेटायाला॥ तेथें मनांत मारण्याचा बेत ठरविला ॥ नानाफडणीस ह्मणे जिवबा दादाला ॥ मला शौचास फार लागला ॥ येतों जाउनी ह्मणुन लवकर उठला ॥ जिवबादादांनी त्याचा हात धरीला ॥ ह्मणे या वीराला पाहुनी सर्वांचा शौच जिराला ॥ तुह्मास शौचास कसें लागलें ह्मणूनी नाना खेंचिला ॥ मग नानानें आर्जव करुनि वीर पाठविला ॥ आणी आपला उलट प्राण राखिला ॥ या परी तो वेळ त्यांनी समजुनी चित्तीं सर्व बेत उमगला ॥ शत्रु ते त्यांचे मित्र जहाले काय सांगूं त्यांचे शूर शूर मुत्सदील्ला ॥ पुणें शहरची स्थिती होती ती न वर्णवे आह्माला ॥ रात्रीं नानाराहत नव्हता एक थाऱ्यावरला ॥ घांशिराम तो आणुन देई गॅरंती स्त्रीयांला ॥ हें मानत नसे महादजी सवाई माधवराव आणि दादाला ॥ ह्मणुन होता नानाचा कंटाळा सर्व अब्रुदार नगराला ॥ हें पातक झालें मराठे पेशवाईला ॥ परि जिवबादादा होते तोंवर पेशवा नाहीं बुडाला ॥ मग लौकरच इंग्रजा-

---

५० ग्रांटडफ म्हणतो शिंद्याचे सर्व कारभारी शेणवी होते. बखर पहा व वि. विस्तार व जुने लेख केरकरांचे येथें पुष्कळ सांपडतात.

जिवबादादांस नाना फडणीसानें मारण्याचा बेत केला होता. त्याच्या दुष्ट कृत्याबद्दल जुने लेख पाहण्यासारखे आहेत.

चा हात रिघाला ॥ हें ठाऊक खबर पाहणार मुत्सदीयांला ॥ २४ ॥

जिवबादादांची होती स्वारी सुंदर ॥ नाहिं अलिकडे देखिली भोज विक्रम राजा नंतर ॥ घोडे हत्तीच्या पायांत होते तोडे सोन्याचे हिरे जडाववर ॥ पालख्या तामदाने लालक्या सांड चालती जलद फार ॥ उंट बेढब परि सजविले दागीन्यावर ॥ लोकह्मणती हे आले तालेवार ॥ पायदळ मधुनी हत्ति चालती वरत्या अंबाऱ्या केल्या दरबार ॥ पुढें घोड्यावर बैसले भालदार चौपदार॥ हातीं सोन्याच्या काठ्या झिळमिळती फार ॥ रांगडे द्वारपाळ कायते शिपाई बुंदेलखंडचे तिरंदाज आणि हलकार ॥ वेळोवेळ करीती पुकार ॥ जिवबादादा बक्षिबहादर ॥ यांसी सांगती लोकांचे सल्लाम ललकार ही दादांची स्वारी आणण्यास लवकर ॥ महादजी दरबार सोडुनी पुढें येत रस्त्यावर ॥ आणि नेऊन बैसवी आपुले उजवे हातीं गादीवर ॥ बाकी सरदार यशवंतराव भाऊराजा जगन्नाथराम केरकर ॥ शिवबा नाना नारायणराव बक्षी केरीगांवकर ॥ लखबादादा बाळोबातात्या पागनीस साळसगांवकर ॥ सदाशिवभाऊ दिवाण सदाशिवरामचंद्र सुखठाणकर ॥ यांचे अधिकार बसवीत उजवे हातीं गांशावर॥ हे वीर देत होते आपली मान लढाईवर ॥ राखित होते सरकारास राज्य नांव हुंशार ॥ सारस्वत गौड ब्राह्मण हे राज्य उत्तम

शुर कारभार करणार ॥ श्रीमंती भोग आणि धन्याचें राज्य नांव राखण्यास कधीं मागें नाहीं घेणार ॥ क्षत्रिय थोडे श्रीमंतींत मागें राहतील तर त्यांस हे वीर आणतील ताळ्यावर ॥ हें बारीक विचार करून पहातील तर ॥ सर्वांस[५२] दिसून येईल समग्र ॥ २९ ॥

जिवबादादाची खासगी काय सांगुं तुह्मा होती ॥ केलें मुलीचें लग्न आरंवदें गांवावरती ॥ साठ हजार फौज होती त्या कृत्यीं ॥ घोडे हत्ती मेणे लालक्या पालख्या यांची नाहीं गणती ॥ वांटिली भुयशी दक्षणा ब्राह्मणा घोड्यांवरती ॥ ही श्रीमंती नाहीं कोणी देखिली कल्पांतीं ॥ प्रत्येक ब्राह्मणाचे वांट्यास आली होती मोहर किंमत रुपये आठशां भरती ॥ त्या रोंगें[५३] ठिकाणी मिळतसे द्रव्य खणिल्यावरती ॥ गृहस्थांस पोषाख सोवळीं तांब्या पंचपात्री पळी त्यावरती ॥ देउनी त्यांस येण्याच्या दूर केल्या हरकती ॥ केली होती लंका रात्रीं उजाडलें ह्मणुनी श्वापदें कुत्रे भुंकती ॥ निराबाई मुलगी बैसली हत्तीवरती ॥ ती दिली

---

५२ नानाफडणीसाच्या ह्या स्त्रैणपणाबद्दल इंग्लिश वकिलानें एक पुस्तक लिहिलें आहे त्यावरून समजेल.

५३ या लग्नाचा जमाखर्च त्यांच्या घरीं केरी येथें आहे, आणि या प्रांती त्या लग्ना वेळीं पोषाख तांब्ये असे लोकांस वांटल्याची मोठी प्रसिद्धी आहे. तीं कित्येक भांडीं अझूनी असलेलीं दाखवितात,

होती बागणीकर मंत्री यांचे घरीं ती ॥ असें लग्न नाहीं होणार मागें पुढती ॥ काय सांगूं जिवबादादांची श्रीमंती वरचढती ॥ २६ ॥

जिवबादादांनी एकंदर लढाया लहान थोर तिनेशें सत्तर केल्या ॥ काय सांगू त्यांची नांवें तुह्मा आतां घर बसल्या ॥ त्या लढायांवर शुरांसही येतसे आंगावर कांटा बघल्या ॥ तीं कामें केलीं जिवबादादा बक्षिबहादर यांनीं हातीं धरिल्या ॥ दिल्लींत अडतीस आणि मारवाडांत एकशें सतरा लढाया केल्या ॥ गुजराथ होळकर इंग्रज निजाम यांच्या पंनास झाल्या ॥ काशींत पंजाब मध्यहिंदुस्थानांत इंगळे रांगड्या चौविस केल्या ॥ भाऊसाहेब सदोबा सोंग आणि पेशवे यांचें प्रधान मंडळ्या चौतीस सगळ्या ॥ पेंढार लूट बादशाई ही सरदार झूट फिरती दारोदार त्या अवघ्या शंभर तगल्या ॥ फिरंगी आणि कर्नाटकांतील खंडणी या सात बघल्या ॥ अणखीं किल्यांच्या आहेत पुष्कळ जमवुन आठवण केल्या ॥ ही जिवबादादांची सडी फौज रात्रंदिवस फिरतसे हिंदुस्थानांत राहुट्या पडल्या ॥ लोक येती रस्त्यांमधुनी पाहण्यास घोडे उंट हत्ती स्वारी निशाणें फडकती भाले पगड्या ॥ २७ ॥

---

५४ हें रोण ठिकाण आरंबदे गांवीं अझून प्रसिद्ध आहे व तेथें केरकर यांचें घर बांधकामें वगैरे पाहण्यासारखीं आहेत.

बादशाई शिंदेशाई पेशवाई रजपुतशाई ॥ यांत केलीं कामें बहुत दादांनीं आणखी ह्मणती हुकुम काई ॥ या शाईस सर्व तोषवुनी दिल्या जहागिऱ्या सांगों नांवें काई ॥ अष्टा, सिहोर, पंचमहाल, सुजालफर, आमझरा, मेवाड हे दिले महालभाई ॥ कुमळनेर, राजनगर, केलवाडा, खमणोर ह्या दिल्या दाई ॥ खासजावद, जिरण, नेमावर, निमच, सत्वास जामगांवचे हे देसाई ॥ सिघनपुर देहरी बिराई ॥ केरी, हरमल, तळगांव हे वाडकरांनी दिले शिवाई ॥ या जिवबादादांच्या जहागिऱ्या वसुलातीस लक्ष भरपाई ॥ राहण्याचे वाडे बादशाई तरेवाई ॥ आहेत ठिकठिकाणीं पहा [५६]नांवे काई ॥ उज्जन, नरवर, ग्वाल्हेर, मंडोसर, मथुराबाई ॥ आगरा, प्रयाग, पुष्कर, काशी, गयाक्षेत्र पुण्याई ॥ जावद, जीरण जामगांव, आरंवदें, हरमल, केरी येथें नवी केली गांव भराई ॥ आणखी आहेत वसविले-

---

५५ जिवबादादांनी एकंदर लढाया व राजकारस्थानें किती केलीं रजपुत मराठे मुसलमान शिक इंग्रज म्हणजे साऱ्या हिंदुस्थानांत त्यांनीं आपली कीर्ति गाजविली आणि प्रत्येक कामांत महादजी शिंद्याचें नांवपुढें आणिलें. हा त्यांचा इतिहास तयार होत आहे त्यांत त्यांच्या येथील सर्व जुने लेख वगैरे कागद प्रसिद्ध होतील.

५६ या जिवबादादांच्या जहागिऱ्यांच्या सनदा त्यांचे घरीं केरी येथे दिल्लीच्या बादशहाकडून मिळालेल्या पारशी भाषेंत रजपूत राजांच्या हिंदुस्थानी भाषेंत शिंद्याच्या मराठींत आणि वाडीसरकारच्या अशा आहेत, व तांब्रपट आहेत. ते पहा.

ले वाडे सुरूखांव पांहीं ॥ (चाल) मथुरा वृंदावन आणि गंगानदीचे कांठीं देवालयें घाट बांधिलीं घनदाटी ॥ कितिएक गांव अग्रहारें दिलीं ब्राह्मणास देणगी मोठी ॥ जिवबादादाची आठवण काढुनी लोक होत बहु संतुष्टी ॥ २८ ॥

ही दिवसेंदिवस शिंदेशाईची बहाली ॥ सर्व हिंदुस्थानांत आणि पेशवाईवर तान झाली ॥ हें मानत नव्हतें नानाफडणिसाला करि भगली ॥ परि त्या जिवबादादांनीं ठेवुनी बाजुस सगळी ॥ चालूं न देई मात्रा नानाची ॥ जिवबा शाहाणा बळी ॥ मग सवाईमाधवराव बाजिराव पेशवे यांचे दादा झाले हितकारी ॥ तें नावडे नाना फडणीसास मनांत चुरचुरी ॥ आणि नाना सवाईमाधवरावास कमी बोलिला भारी ॥ लागलें दुःख पेशव्यासी ह्मण जन्मुनी नाहीं हितकारी ॥ दिली उडी गच्चीवरुनी आश्विनशुद्ध द्वादशी माझारी ॥ मग नाना फडणीसास विचार पडला सत्वरी ॥ हात रिघाला ह्मणे जिवबादादांचा दरबारीं ॥ झालया गोष्टीस इलाज नाहीं ह्मणुनी शिंद्यास विचारी ॥ दौलतराव ह्मणती आह्मी मत देण्यास

५८ दौलतरावास नानाफडणीसानें मत विचारिलें होतें ते ह्मणाले जिवबादादा हिंदुस्थानांत आहेत, ते आल्याशिवाय आमच्यानें मत सांगवत नाहीं. एवढा जाणतेपणा जिवबादादांचा शिंद्याचे दरबारीं होता. पहा पेशव्यांची बखर.

नाहीं पुढारी ॥ आमचे आहेत जिवबादादा पूर्ण विचारी ॥ (चाल) शिंद्याकडे दुजा भाव नाहीं धरिला त्यांनीं ॥ स्वामीकार्य बजाविलें सरळ मनांतूनी ॥ २९ ॥

सवाईपेशवा गेला ॥ आतां गादीस अधिकार कोण केला ॥ यावर लागलें सर्वांचें चित्त मनाला ॥ नाना फडणीसानें दत्तक घेण्याचा ठरविला ॥ त्याकामीं सर्व सरदार झाले कबुलीला ॥ परि नाहीं जिवबादादाचें आलें मनाला ॥ ते म्हणती बाळाजी विश्वनाथाला ॥ बाजीराव अमृतराव आहेत वंशाला ॥ बाजीरावास बसवा गादीला ॥ दत्तकाचें काय येथें कामाला ॥ नाना बाजीचा तंटा मोठा त्याला ॥ नाना म्हणे राज्यीं बाजीराव नाहीं कामाला ॥ परि जिवबादादांनीं त्यास बसविण्याचा हट्ट धरिला ॥ मग कोण पुसत होता त्या अडथळ्याला ॥ लाख घोडा आणि पायदळ होतें बहु त्याला ॥ लढती मारती तरवार होती भय्यासाहेबांच्या[६०] हाताला ॥ हें मनांत

---

५९ मराठ्यांची बखर ग्रांटडफ कृत पहा. यांत बाजीरावास गादीवर बसविण्याविषयीं जिवबादादांनीं सांगितलें आहे. हें गादीवर बसविण्याचें कारण नानाफडणीसांना द्वेष.

६० मोठ्या मनुष्यास उत्तरहिंदुस्थानांत भय्या असें म्हणतात. त्याप्रमाणें जिवबादादास भय्या साहेब असें म्हणत असत.

आणुनी नाना मनीं भ्याला ॥ आलें ह्मणें आपलें जाणें काशीयात्रेला ॥ शेवट काशीयात्रा मग झाली पुरंधर किल्याला ॥ ईश्वरसाक्ष भूत आहे सर्वांला ॥ दुसऱ्याचें अनहित करणें जाणत असतो मनाला ॥ अशा लोकांला तो देत नाहीं सौख्याला ॥ ३० ॥

इतक्यांत जिवबादादांचा काळ समीप आला ॥ इसवीसन सतरांशेंशाण्णव सालाला ॥ पुण्यामधें दादा निघून गेले सांबाचे कैलासाला ॥ मग लोक ह्मणती नानाफडणीसाशीं सामनेदार नाहीं उरला ॥ हें सर्व मानत आहेत खरे पणाला ॥ परंतु ठाऊक त्या पुण्याचे पर्वती देवीला ॥ मग नाना फडणीसानें काय बेत मांडिला ॥ आणि एक सखाराम खड्याचा पाटील तो सर्जेराव घाटगा केला ॥ त्याची मुल खूबसुरत नांव बाईजाबाई इला ॥ दौलतरावाची बायको करण्याला ॥ नाना फडणसिास वेळ न लागला ॥ मग सर्व बेत बांधिला ॥ दौलतराव घेत हाताला ॥ तो भुलला खुबसुरती कैफाला ॥ मग सर्व मुत्सदी

---

६१ जिवबादादा सन १७९६ साल अखेरीस वारल्याचें ग्रांटडफकृत मराठ्यांचे बखरीवरून दिसते व पवाड्याचें पुस्तक यांतही लिहिलें आहे.

सरदार ठेवून बाजूला ॥ सर्जेराव बापूस कारभार दिला ॥ त्यानें महादजी बावांच्या बायकांस त्रास दिला ॥ आणि शिंद्याच्या दरबारचा बेत विसकटला ॥ पुण्यास राहून गोंधळ सारा मांडिला ॥ मुख्य नारायणराव बक्षी दादांच्या वडील मुलग्याला ॥ आणि धोंडबा पागनीस वागळे आणि बडेबडे शूर सरदारांला ॥ दिलें बाणाला आणि तोफेला ॥ यापरि नारायण अभिमन्यु बाळाला ॥ त्या दुष्टानें मारिलें ॥ बाकी सरदार गेले नागपुर इंदुर आणि दतिया राज्याला ॥ तेव्हां शिंदेशाई मराठे पेशवाई सरली हें इंग्रज मनीं समजला ॥ इकडे नाना फडणीसाला आनंद जाहला ॥ ह्मणे दादाचा मुलगा मारवून आपण मागाहून त्यांचा सूड घेतला ॥ परि राज्य धुरंधर जाउन मराठी सरली याला ॥ तो शहाणा ह्मणून समजे परि लोक ह्मणती सर्व फसला ॥ अर्धा शहाणा हें नांव सखारामबापू ह्मणत होते तें मानलें सर्वाला ॥ मग त्या हत्या करुन सर्जेराव घाटग्याला ॥ नाना फडणीसानें दिल्या देणग्या जहागिर कागल गांवाला ॥ इतक्यांत इंग्रज

---

६२ नारायणराव बक्षी यांस मारल्याची माहिती मराठयांचे बखरींत आहे.

बहादर वाघ आला ॥ त्यानें शिंद्याचें सर्व राज्य घेतलें पाहून या वहिवाटीला ॥ मग दौलतराव मनीं उमगला ॥ माझे दादाचा नारायणराव सवाई जिवबादादा ॥ कोठें आहे सांगाहो आह्माला ॥ राज्य गेलें इंग्रज वाघ आला त्याला ॥ माझे सिंव्ह वीर देते असते मुष्टीमोदकाला ॥ हा सर्व नाना सर्जेरावानें गोंधळ केला ॥ मग मानाजी फांकड्यानें विडा उचलिला ॥ आणि सर्जेरावाचे पोटांत भाला मारुनी खाटगा धाटगा मारिला ॥ मग बोलावुनी सर्व सरदार लखबादादा आणि जगोबा बापूला ॥ चवथे लढाईत गोरा कापून इंग्रज हरविला ॥ मग दहा कोटी पैकीं एक कोटी मुलखाला ॥ तह करुनी आधीं खर्चाला घेतला ॥ मग तयारी करुनी पाहूं ह्मणती इंग्रजाला ॥ नव कोट रुपये कसे पचतील त्याला ॥ नंतर शिंदे दरबाराला झाला घोटाळा ॥ मराठे नाते वाईक महिमान बहुतच मीळाला ॥ ते करूं लागले दुष्टपणाला ॥ आणी सरकार तोऱ्याला ॥ तेथुनी सर्व झुंझारवीर गेले विलयाला ॥ (चाल) आणि मग त्यापासुनि शिंदे अलिजा बहादरि तगलेली ॥ जिवबादादांचे मागाहून राहिली ॥ लखबादादा जगोबाबापु यांनीं कांहीं मागें चालविली ॥ ती कचित् दौलतरावानीं कांहींशी भोगिली ॥ २१ ॥

हा बडा रणसिंह जिवबादादा बक्षीबहादर ॥ गेल्या-

वर मग पेशवाई विराली मागोमाग बेत्रिमावे वर्षी झर झर ॥ बाकी शिंदे होळकर गायकवाड भौंसुले नागपुरकर यांना उतरती लागली चाकित होति सर्व ॥ हा शूर मुत्सद्दी जिवबादादा खचित सांगतों देव अवतार ॥ पहा पहा ॥ एवढ्या लढायांत तो सदां जयवंत सर्व ॥ हा पवाडा गानी ऐकती ते शूर मुत्सद्दीपणास मागें नाहीं येणार ॥ ह्मणुनी नरहर सांगत तुह्मा सुविचार ॥ जिवबादादा खरा रणशुरधीर ॥ जगीं गाजली जयाची विजयी तलवार ॥ ३२ ॥

समाप्त.

सावंतवाडीकर भोंसले यांस जिवबा दादांनीं दिल्लीच्या बादशाहा कडून राजेबहादर किताब मोर्चले खिलत वगैरे देवविलीं, त्या मूळ सनदेचा उतारा.

वकील मुमालक मुखत्यार सदाशिव रामचंद्र नायब[६९] बक्षीबहाद्दर मसुदा ऐसाजे आर्जी हजरत जाहां पन्हा यांस केली. वकील मुतालिक मुखत्यार उलमुल उमददूल उमराव फर्जंद आलीजा महाराजाधिराज माधोराव शिंदे बाहादूर श्रीनाथ मजुरीया नायब मवददूल सलतनत आसादुल खीलाफसवाई माधोराव नारायण बहादूर फिदवीं पन्हा गुलाम बादशाहा गाजी याणी डिगेच्या मुकामी आर्ज केला जे खेमसावंत भोसुले सरदेसाई, यांसी राजे बाहद्दर भोसुले यांच्या विशींहीं मरामत व मोर्चलें आहेत परंतु यांजकडेस चालत नाहींत आण खेमसावंत यांची मर्दुमीही बहुतच आहे मोर्चलें व मरामत देणें योग्य आहेत अशा कित्येक शिफारशीच्या वगैरे अर्ज जिवाजी बल्लाळ बक्षीबहादुर यांणीं

६९ नायब बक्षी बहादर म्हणजे असिस्टंट बक्षी व जिवबादादा हे मुख्य बक्षी होते. सदाशिव रामचंद्र हे रामचंद्र मल्हार यांचे चिरंजीव होत.

स्वमुखें हजरत जाहां पन्हासी अर्ज केला तो ध्यानी आणून मरातब दिली जे राजे खेमसावंत भोंसुले बहादूर व मोर्चेलें व खिलात सात पारची वनिम आस्तनि भरजरीदासची व झगा व शिरपेंच व मोत्यांची माळा व झालरदार पालखी व समसेर हल्फ हजारीही मरामत दिल्ही आण सरंजाम मुलुख मशारनिल्हेकडेस पूर्वी पासून चालत आला आहे ऐसा भोगवटा मनास आणिला आण तेणें प्रमाणें फरमानांत लिहून दिला जे प्रांत कुडाळ, तर्फे बांदें, तर्फ माणगांव व तर्फ सांतर्डे, महाल तर्फे पेडणें, डिचोली, सांखळी पंचमहाल, फोंडें पंचमाहाल; हेंवाळें, उसप, मणेरी, सडा जांबोठी, तर्फ मनोहर, साळसी पंचमहाल, निमे पंचवाडी, कर्यादनारूर, कर्यादपाटगांव आटाणें घोल, मायणें घोल, हेरें, व तर्फ चंदगड, तर्फ, वगैरे पुरातन चालत आलें आहे त्या प्रमाणें फर्मान हुजुरून दिलें सुभा विजापूर मरातब वगैरे फरमाने मेहरबान होऊन सनसतिचे सालीं डिगेचे मुकामीं करून दिली अशास फरमानें जयपूरच्या बैद्यांत गैर विल्हेस पडलीं त्याजवर हल्लीं जिवाजी बल्लाळ बक्षीबहादूर यांणी पुनरपी अर्ज केला जे नवीन फरमानें तयार करणेंस जाहांपन्हाचा हुकूम व्हावा तो अर्ज ध्यानीं आणून मेहरबान होऊन फर्मानें तयार करून देविलीं आण येविसीं मांडलिक राजे व पंतप्रधान यांस ही साहित्य पत्रें दिलीं जे

हुजुरून मरातब व मोर्चले वगैरे सरंजाम करून दिल। त्या प्रमाणें चालत जावा आण कोणे गोष्टीची दिकत न करावी हुजुरून करून दिले ते प्रमाण जाणोन वर्तणूक करावी. कोण गोष्टीचा अंदेशा न धरावा ह्मणून सुख येणें प्रमाणें

१ शाहू छत्रपती हर्षनिधानयांस १ फिरंगीगोमंतकवाले यांस
१ करवीरवासी राजे यांसी १ निजामनमुलुक यांस
१ सवाईमाधोराव नारायणपंत १ टिपुसुलतानमिया यांस
प्रधान यांस

६

१ सरंजाम नेमणुक बक्षी मिरजा आकबर शाहा-यास हुकूमकरा येणे प्रमाणें नेमणुकीची सनदहत्फ हजारीं वगैरे नेमणुक सनदरुकार.

आश्रयार्थ आगाऊ सख्या देणाऱ्यांचीं नावें.

महाशय श्रीराम परशराम ठाकूर कोद्वली. ता० राजापूर.

,, अनंत कृष्णराव दिवेकर.

,, कृष्णाजी वासुदेव शाहापूरकर. चंदगड.

,, केशव शाम्बा शेणवी शिरवैकर. गोवा.

,, गुरुराव रामचंद्र सबनीस बेळगांव

,, गोविंद रामचंद्र सडेकर चंदगड.

,, गोविंद व्यंकटेश पतकी चंदगड.

,, गणेश सदाशिव शिरोडकर गोवा.

,, घनश्याम साम्ब शेणवी मळकर्णेकर गोवा.

,, जिवाजी दत्तू शेणवी माहाम्त्ये गोवा.

,, दत्तात्रय अनंत पुरंदरे बेळगांव.

,, दत्ताराम जयवंत शेणवी बोरकर गोवा.

,, नारायण पांडुरंग केंकरें नवीन गोवें.

,, नारायण जगनाथ कामत ,,

,, पुरुषोत्तम गोविंद कलघटगीकर बेळगांव.

,, पुंडलिक सांब मळकर्णेकर गोवा.

,, पांडुरंग खळू प्रभू लवंदे गोवा.

,, आत्माराम भिकाजी झणकर आजरें.

,, बळवंत अण्णाप्पा हणमशेट बेळगांव.

,, भास्कर सदाशिव शेणवी केंकरे गोवा.

,, मंगेशराव पद्मनाभ कार्के बेळगांव.

महाशय माणी सांतु शेणवी गोवा.
,, मुकुंद व्यंकटेश शेणवी वागळे गोवा.
,, मंगेश साम्बाराव वाळावलीकर गोवा.
,, मंगेशराव गोपाळ केंकरे ग्वाल्हेर.
,, यशवंत दत्तात्रेय देशपांडे चंदगड.
,, रामचंद्र मंगेश बिडीकर बेळगांव.
,, रामचंद्र गोपाळ मोरडेकर ,,
,, रामचंद्र मंगेश केंकरे ,,
,, रामकृष्ण विठ्ठल शेणवी रातांबोले गोवा.
,, रामनाथ भगवंत पई रायकर गोवा.
,, लक्ष्मण महादेव पाटणेकर बेळगांव.
,, वासुदेव गणेश नाडगोंडे हलकर्णी.
,, विश्राम हरि सबनीस तुर्केवाडी.
,, विष्णु वासुदेव शहापूरकर बिडी.
,, वासुदेव रामचंद्र नाडकर्णी हल्याळ.
,, विष्णु केशव भोबे गोवा.
श्री० विष्णु गिरिधर शेणवी धेंपे गोवा.
महाशय विश्वनाथ अनंत केणी.
,, व्यंकटेश कृष्णराव शिवलकर बेळगांव.
,, शान्ताराम सदाशिव साखरदांडे गोवा.
,, शंकर विष्णु शेणवी शिरवैकर गोवा.
,, सदाशिव नीलकंठ वागळे हल्याळ.
,, हरि भास्कर नाडगोडा. कानडी—चंदगड.